agriculture
I-AGRI
is my passion
Powered by KRISHITHON

# कृषीथॉन®
# सन्मान 2026




**26 - 30 नोव्हें 2026**

- पुरस्कर्ता -
Krishithon®
कृषीथॉन

- आयोजक -
HSF
Human Service Foundation
A Regd. Trust

- संकल्पना -
YOUTH IN AGRICULTURE

# युवकांचे कृषि क्षेत्रातील महत्व अधोरेखीत करणारा उपक्रम !



**पद्मविभुषण मा. शरद पवार**
माजी कृषी मंत्री, भारत सरकार



**मा. राजेंद्र सिंह - जलपुरूष**
मॅगेसेस ॲवॉर्ड विजेता



**मा. ज्ञानेश्वर बोडके**
अभिनव फार्मर्स क्लब



**राहीबाई पोपरे, बीजमाता**



**पद्मश्री मा. सुभाष पाळेकर - प्रवर्तक, झीरो बजेट नॅचरल फार्मिंग**

## प्रयोगशील कृषी सन्मान व संमेलन : २०२६

भारतीय कृषी क्षेत्रास सातत्याने वेगवेगळ्या गंभीर समस्या भेडसावत आहेत. बदलत्या हवामानासोबत मानवनिर्मित समस्यांचा देखील विळखा या क्षेत्रास पडला आहे. एका बाजूस वाढत्या जनसंख्येस अन्न पुरविण्याचे आव्हान आणि दुसऱ्या बाजूस शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा भाव यातील तफावत यामुळे ग्रामीण भागातील युवक शेती व्यवसाय सोडून शहराकडे स्थलांतरीत होत आहे. अशावेळी गरज आहे ती कृषी क्षेत्रात कार्यरत असलेले शेतकरी, कृषी संशोधक, उद्योजक आणि कृषी विभागात विस्ताराचे कार्य करणाऱ्या प्रयोगशील युवकांच्या माध्यमातून या समस्यांवर उत्तर शोधण्याची आणि त्यांच्या कार्याची दखल घेण्याची.

कृषीथॉन या प्रदर्शनाच्या माध्यमातून सन १९९८ पासून युवकांचा शेतीतील सहभाग या विषयावर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. या माध्यमातून विचारांच्या देवाण - घेवाणी सोबत नवनवीन तंत्रज्ञानासोबत युवक जोडला गेला आहे. याची प्रचिती नाशिक जिल्ह्यातील कृषीक्षेत्राचा विकास इतर जिल्ह्याच्या तुलनेत बघितल्यावर लक्षात येते, याचे मुख्य श्रेय जाते ते युवकांना, ज्यांनी तंत्रज्ञान आत्मसात केले, त्याचा वापर केला आणि तंत्रज्ञान समाजात प्रसारीत केले.

**कृषीथॉन प्रदर्शनात सातत्याने भेट देणाऱ्या युव कृषी मित्रांना दरवर्षी कसा फायदा होतो आणि प्रदर्शनातले तंत्रज्ञान आणि तज्ज्ञांच्या योग्य मार्गदर्शनामुळे आम्ही सगळे (अपडेट) अद्ययावत होत जातो. हे आवर्जून ऐकायला मिळते.**

### कृषीथॉन : बदल घडविणारे व्यासपीठ

महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातून जे युवा कृषी क्षेत्रात कार्यरत आहेत. शेतकरी, शास्त्रज्ञ आणि कृषी उद्योजक, ज्यांनी विकासाचे ध्येय गाठण्याचे स्वप्न उराशी बाळगले आहे. अशा युवकांच्या विचारांची देवाण-घेवाण कृषीथॉनच्या या व्यासपीठावर होणार आहे.

### कृषी क्षेत्रातील कार्यसम्राटांकडून मार्गदर्शन

आपल्या कार्याने ज्यांनी कृषी क्षेत्रास नवीन संकल्पना, कृषीक्षेत्राचे संवर्धन किंवा ग्रामीण भागात रोजगार निर्मिती केली. अशा प्रतिभावंत कार्य सम्राटांद्वारे मार्गदर्शन व शंका निराकरण कृषीथॉनच्या या व्यासपीठाद्वारे होणार आहे.

# आमच्या कौशल्याने बहरेल कृषिक्षेत्राचे रूप !








कृषीथॉन युवा सन्मान दरम्यान आपले विचार व्यक्त करतांना युवा.



## कार्याचा गौरव

संमेलनात सहभागी झालेल्या प्रयोगशील कर्तबगारांच्या कार्याचा गौरव करण्यात येईल, यात खालील श्रेणीत कार्यरत असलेल्या कर्तबगारांची निवड करण्यात येईल.

- **प्रयोगशील शेतकरी** पुरूष / महिला
- **प्रयोगशील कृषी संशोधक**
- **प्रयोगशील कृषी उद्योजक**
- **गुणवंत कृषी विद्यार्थी**

## कृषी तंत्रज्ञान विस्तार कार्यात प्रयोगशीलता दर्शविणारे खालील श्रेणीतील कर्तबगार

**कृषी विभाग** | **सामाजिक संस्था** | **कृषी विद्यापीठ** | **कृषी विज्ञान केंद्र**

## कृषीथॉन सन्मान पुरस्कारासाठी पात्रता

१) अर्जदार हा भारतीय नागरिक असावा.

२) अर्जदार २५ ते ३५ या वयोगटातील असावा

३) अर्जदाराने पुरस्कारासाठी असलेल्या फॉर्ममध्ये संपुर्ण माहिती भरून देणे अनिवार्य आहे. अपूर्ण माहिती असल्यास प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाही.

▸ नामांकनासाठी अंतिम दि.३० सप्टेंबर २०२६

## आयोजक : ह्युमन सर्व्हिस फाऊंडेशन, नाशिक

ह्युमन सर्व्हिस फाऊंडेशन सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी संस्था असून, सन १९९८ पासून समाजातील विविध घटकांना एकाच उद्देशाने एकत्रित आणून कृषी, सामाजिक, स्वास्थ्य, बाल व महिला हक्क यांसारख्या विविध विषयांवर कार्य करीत आहे. संस्थेतर्फे भरविले जाणारे कृषीथॉन हे आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शन असंख्य शेतकरी, कृषी व्यावसायिक, कृषी संशोधक आणि अभ्यासकांसह कृषी क्षेत्राशी निगडित नागरिकांचे हक्काचे व्यासपीठ बनले आहे. या प्रदर्शनात आयोजित परिसंवाद, चर्चासत्र, कार्यशाळा हे उपक्रम शेतकरी आणि कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये नवसृजनाची बीजे रोवून त्यांना प्रेरित करीत आहेत. ह्युमन सर्व्हिस फाऊंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून शेतीत करिअर करू इच्छिणाऱ्या युवकांना मार्गदर्शन करून त्यांना करिअरच्या संधी देखील उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात अनेकांसाठी ह्युमन सर्व्हिस फाऊंडेशन प्रेरणास्त्रोत म्हणून पुढे आले आहे.

# कृषी विकासासाठी कटीबध्द - चला करूया कृषी समृध्द !



**मा. एकनाथ डवले**
प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग



**मा. सुरज मांढरे**
आयुक्त, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन



**मा. विश्वास नांगरे पाटील**
पोलीस आयुक्त, नागपुर



**मा. विलास शिंदे**
चेअरमन, सह्याद्री फार्मस्





**मा. मकरंद अनासपुरे**
संस्थापक, नाम फाऊंडेशन



**साहील न्याहारकर**
आयोजक - कृषीथॉन

## आयोजक शहर : नाशिक

नाशिक शहरात कृषीथॉनच्या माध्यमातून युवा सन्मान व संमेलनाचे आयोजन करतांना अभिमान वाटत आहे. नाशिक शहराभोवती वसलेले सह्याद्री डोंगरांचे निसर्ग सौंदर्य, सुखकर व आल्हाददायक हवामान हे शहराच्या सौंदर्यात अधिकच भर घालते. महाराष्ट्रातील या जिल्ह्याने कृषी क्षेत्राशी निगडित आपले विशेष योगदान दिले आहे. या योगदानाच्या बळावर नाशिक शहर आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला विशेष ठसा उमटविण्यात यशस्वी होतांना दिसत आहे. नाशिक परिसरात वेगवेगळ्या प्रकारच्या पिकांचे उत्पादन घेतले जाते व ही भूमी कृषी क्षेत्रातील भरीव योगदानाची कर्मभूमी म्हणूनही आपले नाव जगभरात अधोरेखित करीत आहे. संपूर्ण भारतातून नाशिक जिल्ह्याचा कृषी योगदानात प्रथम क्रमांक लागतो. नाशिकमध्ये उत्कृष्ट दर्जाची द्राक्षे, कांदा व डाळिंबाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. या फळांसाठी नाशिकला निर्यातदार म्हणून सुध्दा ओळखले जाते. त्याच प्रमाणे ताजा भाजीपाला सुध्दा येथे विपुल प्रमाणात तयार होतो. याशिवाय नाशिकमधून संपूर्ण भारतभर सहज वाहतूक होते हे विशेष.

Krishithon®
कृषीथॉन

**भारतातील अग्रगण्य कृषी प्रदर्शन**

**26th - 30th नोव्हें. 2026**

**नाशिक, महाराष्ट्र, भारत**

**नामांकन अर्ज आणि नोंदणीविषयी अधिक माहितीसाठी संपर्क करा.**

**प्रिती सवाशे - पुरस्कार समन्वयक, मो.नं. 9730314560**

**फोन करण्याची वेळ : सकाळी १०:१५ ते सायं. ५:३० पर्यंत**

**सूचना :** तुम्ही नामांकनासाठी अर्ज पाठविला म्हणजे तुमची अंतिम निवड झाली असे नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

HSF **Human Service Foundation**
A Regd. Trust

**ह्युमन सर्व्हिस फाउंडेशन**
**मिडीया हाऊस** - आनंदी नगर, आनंदवल्ली जवळ, गंगापूर रोड, नाशिक, महाराष्ट्र, भारत - ४२२०१३ | ई मेल : agritrademedia@gmail.com